-----------------

Media Coverage – Cleanliness Drive at Mundwa, Pune



**मुंढवा : भारत फोर्ज व ग्रामपंचायतीतर्फे राबविण्यात आलेले स्वच्छता अभियान.**

## केशवनगरमध्ये स्वच्छता अभियान

मुंढवा, ता. १५ : भारत फोर्ज व ग्रामपंचायतीच्या पुढाकाराने केशवनगरमध्ये स्वच्छता अभियान राबविण्यात आले. रेणुकामाता मंदिर रस्ता व कुंभारवाड्याची स्वच्छता करण्यात आली. जिल्हा परिषद सदस्या वंदना कोद्रे, ग्रामविकास अधिकारी दत्तात्रेय पवार, डॉ. दादा कोद्रे, शक्ती प्रधान, सागर बार्देसकर, राजू पानमंद, नारायण जाधव, भारत फोर्जचे जालिंदर दराडे, प्रभात बेळगावकर, अंजली यादव, अक्षता चंचे, देवानंद रोकडे, अजित भुजबळ, भारत फोर्जचे अधिकारी व कर्मचारी तसेच विद्यार्थी यात सहभागी झाले होते. गायरान येथील कचरा डेपोत सुमारे २८ टेंपो कचरा टाकण्यात आला. रस्त्याच्या दोन्ही कडेला स्वच्छता करून जंतनासक पावडर टाकण्यात आली.

# मुंढव्यात स्वच्छ भारत अभियान

## 'भारत फोर्ज'चा पुढाकार



कामगार आणि अधिकारी यांच्यासमोर बोलताना डॉ. बाबासाहेब कल्याणी.

पुणे/मुंढवा : महात्मा गांधी जयंतीचे औचित्य साधून भारत फोर्जतर्फे मुख्य प्रवेशद्वारासमोरील दोन्ही प्रमुख रस्त्यावर स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या अभियानात ३५० ते ४०० कर्मचारी व अधिकारी सहभागी झाले होते.

याप्रारंभी सी. एस. आर. विभाग प्रमुख लीना देशपांडे म्हणाल्या की, भारत फोर्ज या परिसरात सातत्याने स्वच्छता अभियान राबविते. या भागात या स्वच्छता अभियानाच्या माध्यमातून सातत्याने कंपनीच्या मुख्य प्रवेशद्वारासमोरील रस्ते स्वच्छ ठेवण्याचा आम्ही प्रयत्न करणार आहोत. भारत फोर्जचे चेअरमन बाबासाहेब कल्याणी म्हणाले की, हडपसर मुंढवा परिसरातील मनपा शाळांमध्ये भारत फोर्जच्या मदतीने या विभागातील काही शाळांमध्ये आतिशय स्वच्छ व सुंदर शौचालय ठेवले गेल्यामुळे विद्यार्थ्यांची शालेय उपस्थितीमध्ये वाढ झाली. यावेळी भारत फोर्ज कंपनीचे अधिकारी वर्ग शाम टकले, गणेश जवळे, व्ही. एस. वैद्यनाथन, तरुण गोयल, एच. के. एन. स्वामी, रवींद्र प्रसाद, हर्षा बसवराज, मंगेश कुलकर्णी, विवेक सगरे, आर. सी. गुंड, आश्विन महाजन, सूर्यकांत जाधव इत्यादी अधिकारी व भारत फार्ज कामगार युनियनचे अध्यक्ष दिलीप जामदार व सर्व पदाधिकारी उपस्थित होते.